क्र 4

महाराष्ट्र शासन

क्रमांक: विहएलएस१०८४/१८५६८[सीआर७५३]
प्राशि-३.

शिक्षण व सेवा योजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १९ एप्रिल, १९८५.

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे.

विषय : माळेगाव सहकारी साखर कारखाना
शिवनगर, ता. बारामती

प्राथमिक शाळेस परवानगीबाबत.

माळेगांव सहकारी साखर कारखाना लि. या संस्थेने शिवनगर, ता. बारामती जि. पुणे येथे "शिशुविहार" या नांवाने सुरू केलेल्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विनाअनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादीत व प्रशिक्षित [एस.एस.सी.डी.एड.] नेमला पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

...२/-

८. शाळेच्या फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण भरलेले पाहिजे.

२. आपणांस विनंती की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपला कार्यपूर्तीचा अहवाल शासनास यथावकाश पाठवावा.

( बं. कों. व्यवहारे )
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे.
प्रशासनाधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, बारामती जि.पुणे.
अध्यक्षा, शिशुविहार, शिवनगर, ता. बारामती जि.पुणे.

यांचेकडे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अध्यक्षा,
शिशुविहार शिवनगर,
ता. बारामती [illegible]